# नियमित दिवाणी दावा क्र. २२३/१९७५ मधील निशाणी क्र. ३०३ कडील अर्जावर आदेश

१) वादींनी प्रस्तुतचा अर्ज दि. २०/०६/१९४७ रोजीच्या गहाणखताच्या दस्तासंदर्भात सदर दस्ताच्या प्रमाणित प्रतीद्वारे दुय्यम पुरावा देण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) वादींच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार दावा मिळकतीचा दिनांक २०/०६/१९४७ रोजीचा मुळ गहाणाचा दस्त प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या ताब्यात आहे. दिनांक ०३/०२/१९६६ व दिनांक १०/०१/१९६७ रोजीची खरेदीखते व दिनांक २०/०६/१९४७ रोजीचा गहाणाचा दस्त सदर प्रतिवादी क्र. १ व २ यांनी या प्रकरणात हजर करावा याकरीता वादींनी निशाणी क्र. २९१ कडे अर्ज दिला होता. सदर अर्जातील मागणीच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र. २ ने दिनांक ०३/०२/१९६६ व दिनांक १०/०१/१९६७ रोजीचे दस्त हजर केले आहेत. परंतु गहाणाचा दस्त त्यांच्या ताब्यात नसल्याचे कथन केले आहे. सदर दस्त हजर करण्यासाठी वादींनी प्रतिवादी क्र. १ ला नोटीस दिली होती. परंतु, प्रतिवादी क्र. १ ने गहाणाचा मुळ दस्त हजर केलेला नाही. प्रस्तुत अर्जात वादींनी अशी विनंती केली आहे की, दिनांक २०/०६/१९४७ रोजीच्या गहाणाच्या दस्तासंदर्भात सदर दस्ताच्या प्रमाणित प्रतीद्वारे दुय्यम पुरावा देण्यास परवानगी द्यावी.

३) प्रस्तुत अर्जास म्हणणे देण्याबाबत प्रतिपक्षास आदेशित केले आहे. प्रतिवादी क्र. २ च्या वारसांतर्फे प्रस्तुत अर्जावर दिलेल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, मुळ कथित दस्त प्रतिवादी क्र. २ च्या वारसांकडे नाही. दुय्यम पुराव्याबाबत वादींनी योग्य ती पुर्तता केलेली नाही व त्यामुळे अर्ज रद्द करावा.

४) प्रतिवादी क्र. १अ ते १फ यांनी या अर्जास त्यांचे म्हणणे दाखल केले

नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. १अ ते १फ यांच्या म्हणण्याशिवाय पुढे चालविण्याबाबत प्रस्तुत अर्जावर आदेश पारीत केला आहे.

५) प्रस्तुत अर्जाच्या कामी वादींच्या व प्रतिवादी क्र. २ च्या वारसांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाच्या युक्तीवादाकामी प्रतिवादी क्र. १अ ते १फ यांना व त्यांच्या विद्वान वकीलांना वारंवार पुकारले असता गैरहजर असल्याने प्रतिवादी क्र. १अ ते १फ यांच्यातर्फे प्रस्तुत अर्जावर युक्तीवाद नाही असा आदेश पारीत केला आहे.

६) वादींच्या व प्रतिवादी क्र. २ च्या वारसांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला असता व रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादींनी प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकत गहाण मुक्त करुन तिचा प्रत्यक्ष कब्जा वादींना मिळण्याकरीता केला आहे. वादींच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार दावा मिळकतीचा दिनांक २०/०६/१९४७ रोजीचा मुळ गहाणाचा दस्त प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या ताब्यात आहे. प्रतिवादी क्र. २ च्या वारसांनी या अर्जावर दिलेल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, मुळ कथित दस्त प्रतिवादी क्र. २ च्या वारसांकडे नाही. प्रतिवादी क्र. १अ ते १फ यांनी या अर्जावर म्हणणे दाखल करुन दावा मिळकतीचा मुळ गहाणाचा दस्त त्यांच्या ताब्यात असल्याबाबतचे वादींचे कथन नाकारले नाही. वादींनी या प्रकरणात निशाणी क्र. २०९ कडील यादीसोबत अनु. क्र. १ कडे दिनांक २०/०६/१९४७ रोजीच्या गहाणाच्या दस्ताची दुय्यम निबंधक कार्यालयातून दिलेली प्रमाणित प्रत दाखल केली आहे. प्रतिवादी क्र. २ च्या वारसांनी मुळ गहाणखताचा दस्त त्यांच्या ताब्यात नसल्याबाबत कथन केले आहे ही बाब विचारात घेता व प्रतिवादी क्र. १अ ते १फ यांनी या अर्जावर म्हणणे दाखल करुन दावा मिळकतीचा मुळ गहाणाचा दस्त त्यांच्या ताब्यात असल्याबाबतचे वादींचे कथन नाकारले नाही ही बाब

विचारात घेता माझ्या मते वादींनी दिनांक २०/०६/१९४७ रोजीच्या गहाणखताच्या दस्तासंदर्भात सदर गहाणखताच्या प्रमाणित प्रतीद्वारे दुय्यम पुरावा देण्यास परवानगी मिळण्याची प्रस्तुत अर्जामध्ये केलेली विनंती समर्थनीय आहे. त्यामुळे वरील नमुद कारणांमुळे माझ्या मते प्रस्तुतचा अर्ज न्यायाच्या दृष्टीने मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आ दे श

१) प्रस्तुतचा अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

२) दिनांक २०/०६/१९४७ रोजीच्या गहाणखताच्या दस्तासंदर्भात सदर गहाणखताच्या प्रमाणित प्रतीद्वारे दुय्यम पुरावा देण्यास वादींना परवानगी देण्यात येते.

३) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2026.02.16 17:35:05 +0530

दिनांकः– १६/०२/२०२६ (पां. लिं. घुले)
ठिकाणः– कराड. २रे सह दि. न्या. व. स्तर, कराड